# मेट्रो-३ : २२ किलोमीटर बोगद्याचे काम पूर्ण



◆ कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ चे काम वेगाने सुरु असून, सद्यस्थितीमध्ये या संपुर्ण प्रकल्पातील नवव्या बोगद्याचे म्हणजे पॅकेज ५ मधील पहिल्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आली. या कामामुळे आता एकूण २२ किलोमीटर बोगद्याचे काम पुर्ण झाले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, सांताक्रूझ येथील विद्यानगरी परिसरात गोदावरी या टिबीएम मशीनच्या मदतीने बोगद्याचे काम करण्यात आले आहे.

◆ मेट्रो-३ चे काम एकूण सात पॅकेजमध्ये विभागण्यात आले आहे. त्यापैकी पाचव्या पॅकेजमधील पहिल्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. ४ ऑगस्ट रोजी गोदावरी मशीनद्वारे बीकेसीमधून या बोगद्याचे काम हाती घेण्यात आले होते; या बोगद्याचे काम १८५ दिवसांत पूर्ण झाले आहे. ८९० मीटर लांबीचा हा बोगदा आहे. पॅकेज पाच मध्ये एकूण चार स्थानके येत असून, धारावी, विद्यानगरी, बीकेसी आणि सांताक्रूझ अशी स्थानकांची नावे आहेत.